लेख

# असा धरी छंद

**✶ बागेश्री परीख ✶**

११ मार्च २०२० ला सकाळीच लोकमान्य सेवा संघातील माझ्या समुपदेशन केंद्राचे उद्घाटन संघातील कार्यकारी मंडळासमोर झाले. केव्हढ्या उत्साहाने मी ह्या केंद्राची समन्वयक म्हणून जबाबदारी स्वीकारली होती. आणि त्याच दिवशी संध्याकाळी संघाच्या सभेत असतानाच अचानक माझ्या पायाचे फ्रॅक्चर झाले आणि मी खरोखरच हादरले.

त्यानंतर हॉस्पिटलायझेशन, शस्त्रक्रियेला सामोरे जावं लागलं. १८ तारखेला मी वॉकरच्या सहाय्याने घरी चालत आले. आता थोड्याच दिवसात सगळं पूर्ववत होऊन मी माझ्या ज्येष्ठ नागरिकांच्या समुपदेशनाला सुरुवात करू शकेन, अशी मनाची समजूत करीत असतानाच टाळेबंदी (लॉकडाऊन)ची घोषणा झाली आणि सर्व मनसुब्यावर पाणी पडले. त्यात बाहेरून कामाला येणाऱ्या बाईपण यायच्या बंद झाल्या. पण सख्खे शेजारी मदतीला आले. जेवणापासून घराची स्वच्छता करण्यातसुद्धा त्या सर्वांनी खूप मदत केली. त्यात माझी वहिनी सुरेखा जवळ राहत असल्यामुळे तीपण जेवणाचा डबा पाठवायची. ह्या सगळ्यांचे प्रेम, जिव्हाळा व आपलेपणा पाहून मी भारावून गेले. आता घरातच राहणं क्रमप्राप्त होतं. मग घरातच राहून विरंगुळा शोधण्याचे प्रयत्न चालू झाले.

आमची ज्येष्ठांना सेवा पुरविणारी लोकमान्य सेवा संघाची 'दिलासा शाखा' कार्यरत ठेवणंही क्रमप्राप्तच होतं. आमच्या ह्या सर्व ज्येष्ठ सभासदांशी संपर्कात राहण्यासाठी व त्यांना विरंगुळा मिळावा ह्या दृष्टीने झूम ॲपवर कार्यक्रम करायला



सुरुवात केली. ह्यासाठी आमची सभासद नीलम वराडकर हिने पुढाकार घेतला. सर्व सभासदांनी ज्येष्ठांना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कसा करावा ह्याची जुजबी ओळख करून दिली.

दर गुरुवारी १ तास कुठलातरी विषय देऊन वृद्धाना बोलतं करण्याचा प्रयत्न केला. सध्या जवळजवळ ४५ ते ५० वृद्ध ह्यात सहभागी होत आहेत.


स्वरचित कविता, प्रत्येकाने एकतरी चारोळी म्हणणं, तुमच्यावर प्रभाव पाडणाऱ्या व्यक्तीविषयी बोलणं, पॉझिटीव्ह स्ट्रोक्स, प्रवासातील कठीण

प्रसंग, गुंफण म्हणजे स्वत:च्या नावाची अक्षर घेऊन त्याची गुंफण पद्यात किंवा गद्यात असे अनेक विषय हाताळले गेले आणि अजूनही नवनवीन विषय समोर येत आहेत आणि सर्व सभासदांना एकमेकाला भेटण्याचा आनंद मिळत आहे.

ह्याशिवाय लोकमान्य: एक युगपुरुष, 'मनस्पर्शी" म्हणजे थोर व्यक्ती, ज्यांची जन्मशताब्दी ह्या वर्षी आहे, त्यांची पुन: ओळख असेही कार्यक्रम केले. अण्णाभाऊ साठे, रवी शंकर, नानी पालखीवाला, सत्यजीत रे, नरसिंहराव अशा त्या व्यक्ती होत्या. मी श्री नानी पालखीवालांची ओळख व त्यांनी चालविलेल्या खटल्याविषयी बोलले. हे सर्व करताना ह्या कार्यक्रमामध्ये फक्त मनोरंजन म्हणून न पाहता त्या विषयाचा सखोल अभ्यास करण्याची वृत्ती ज्येष्ठांमध्ये असावी अशी अपेक्षा होती. त्याच दृष्टीने हे कार्यक्रम केले व करीत आहोत.

ह्या कार्यक्रमाव्यतिरिक्त माझं समुपदेशनाचं काम चालूच होतं. पण कुणालाही वैयक्तिकरित्या न भेटता फोनवरूनच समुपदेशन चालू होतं. वृद्धांच्या कौटुंबिक समस्या, त्यांच्या कायदेशीर बाबी, इच्छापत्र, वैवाहिक समस्या, कधीकधी नुसताच मनमोकळा संवाद. अशा बऱ्याच केसेस हाताळल्या. आपल्या अनुभवाचा फायदा समाजाला मिळावा या दृष्टीने हे काम चालू ठेवले आहे.

हे सर्व करत असताना माझे छंद जोपासायला भरपूर वेळ मिळाला. तंजोर शैलीतील चित्रे व गंगेचा





घाट चितारताना, एक दिवस खिडकीतून दिसणारा लाल शेंदरी रंगाचा गुलमोहर कॅनव्हासवर उतरविला. अशी बरीच चित्रे मी काढू शकले.

बिल्डिंगमधल्या मुलांना माझी चित्र पाहून मजा वाटायची. मग एक दोघांनी धीर करून मला विचारलंच, ''काकू, आम्हालापण शिकवाल का चित्र काढायला?'' मला त्या लहानग्यांना नाही म्हणता आलं नाही आणि मग रोज मी त्या मुलांना चित्र काढायला, रंगवायला शिकवायला लागले.

दरवर्षी मी लोकमान्य सेवा संघात व शाळांमध्ये गणपती बनवायची कार्यशाळा घेत असे. ह्या वर्षी सोशल डिस्टंसिंगमुळे ते शक्य नव्हते. मग जवळपासची मुले शाडूच्या मातीची गणपतीची मूर्ती शिकण्यासाठी घरी यायला लागली. छोटे बाळगणपती स्वत:च बनवल्याचा आनंद त्या मुलांच्या चेहऱ्यावर दिसायचा व आपली ही कला शिकविल्याचं समाधान मला मिळायचं. काही मुलांना, दोहा, कतार येथे राहणाऱ्या माझ्या भाच्यांनाही मी झूमवर गणपती शिकविले. पिठोरी

अमावस्येच्या दिवशी आमच्या छोट्या समाईरासाठी मी बेसनाची फळे करून वायन दिले. ती पाहूनसुद्धा बऱ्याच नातेवाईकांना ती शिकाविशी वाटली. मग मी त्या सगळ्यांना झूमवर ती फळे कशी करायची व कशी रंगवायची हेसुद्धा दाखविले.

माझा आणखी एक छंद म्हणजे खाण्याचे वेगवेगळे पदार्थ बनविणे व शेजाऱ्यांना पाठवणे. वेळ भरपूर असल्याने पाव, केक्स, बिस्किटस्, ढोकळा, खांडवी असे अनेक पदार्थ केले व माझा हा आवडता छंद जोपासला.

ह्याबरोबरच मन रिझविण्यासाठी संगीताची जोड होतीच. वयानुसार आता गाणं शिकणं शक्य नव्हतं, पण काहीतरी वाद्य शिकावं म्हणून हार्मोनियम वाजविण्याचे धडे घेऊ लागले. अजूनही आमच्या जवळच राहणारे शिक्षक मला घरी येऊन पेटी शिकवतात.

अशा सगळ्या मनाला प्रफुल्लीत करणाऱ्या ॲक्टीविटी करून क्रियाशील राहून टाळेबंदीवर मात करण्याचा प्रयत्न करीत आहे.

*


# CANOPUS EYE CENTRE

COMPREHENSIVE EYE CARE

## DR. SOHAIL NRUPAL KOTHARE

**M.B.B.S. , D.O.M.S. , D.N.B ., F.C.R.S**

EYE SURGEON, CATARACT AND REFRACTIVE SURGERY SPECIALIST

***"OUR VISION IS TO HELP YOURS"***

**OUR SERVICES**

Comprehensive eye exams

Treatment and management of ocular disease

**Refractive error correction**

**Cataract surgery**

**Dry eye management**

**Cornea and external disease Glaucoma treatments Diabetic eye exams**

***To see better come see us*** :

**CANOPUS EYE CENTRE**

**UNIT NO. 2 , GROUND FLOOR , MANISH TOWER J.P.ROAD , MANISH NAGAR , ANDHERI (W), MUMBAI – 400053**

**PHONE : 022-26301005 , 7639819699 , 9920061549**

**E MAIL : sohailkothare@gmail.com**

**TIMINGS : MORNING : BY APPOINTMENTS EVENING : 4 – 9 P.M.**

लेख

# निसर्गाच्या सान्निध्यात

**⋆ आरती कोठारे ⋆**

नमस्कार मंडळी,

गेल्यावेळी मी माझा लॉकडाऊनमधला आगळा-वेगळा अनुभव तुम्हासर्वांशी शेअर केला होता.

आजकाल चहुबाजूना नुसता कोरोना आणि लॉकडाऊनचा जप सुरू आहे म्हणून म्हटलं ह्यावेळी थोडा वेगळा विषय घेऊ... सर्वांना आनंद देईल, उत्साहित करेल आणि मन प्रफुल्लित ठेवेल असा. म्हणून आजचा हा खास लेख...

मी अजूनही शेतावरच आहे. इकडच्या परिस्थितीत फारसा बदल नाही. माझी ऑनलाईन लेक्चर्स सुरू झाली आहेत. गावातल्या मंडळींनी कंटाळून मास्क लावणं बंद केलंय आणि ऋतु बदलला आहे. उन्हाळा संपून- आता पावसाळा सुरू झालाय-इतकंच. पाऊस-पाण्याचे दिवस असल्याने वीजकपात



वारंवार सुरू झाली आहे.

माझ्या अभ्यासात खंड पडण्याची दोन प्रमुख कारणं म्हणजे ही वीजकपात आणि एक्सेस स्क्रीन टाईममुळे वाढलेली डोकेदुखी व डोळेदुखी. मग अशा वेळी काय करायचं? एकतर घराबाहेर पडायचं, किंवा गच्चीत जायचं, नाहीतर खिडकी आहेच की! अशा मोक्याच्या ठिकाणी जाऊन, निसर्गाचा आस्वाद घ्यायचा.

माझ्या आजच्या लेखाचा गाभा तुमच्या लक्षात आलाच असेल. निसर्ग, निसर्ग-सौंदर्यआणि निसर्गाच्या सान्निध्यात...

इथली पहाट अपेक्षेपेक्षा थोडी वेगळीच असते. इथे पहाट कोंबड्याच्या आरवण्याने होत नाही.आसपास कोंबडे नाहीत असे नाही; पण हा बुवा पहिला नंबर लावत नाही इतकंच. इथल्या रम्य पहाटेचं स्वागत गीत तितक्याच रम्य सुरात गाण्यास एक गायक सज्ज असतो. हा गायक म्हणजे दयाळ (Oriental Magpie Robin).

दयाळ हा त्याच्या सुरेल स्वरांनी ओळखला जातो. काळ्या-पांढऱ्या रंगाचा हा पक्षी निरनिराळ्या ताना घेत, शेपटी वर उडवत फिरतो. मग एकआवाज चौफेर घुमतो... कुप...कुप...कुप... हा आवाज असतो भारद्वाजाचा.

ह्याला कुक्कुट कुंभ असेही म्हणतात. जमिनीवर उतरून गवतातले किडे, सरडे वगैरे खाणे हा ह्याचा आवडता छंद. कावळ्याच्या मानाने किंचित मोठा, लाल डोळे आणि तांबुस-पिंगट पंख असणारा हा पक्षी. झाडांत शिरताच दिसेनासा होतो. ह्याचं दर्शन शुभ मानलं जातं. रोज आम्हाला ह्यांची एकतरी जोडी दिसतेच दिसते. मग

किलबिलाट सुरू होतो लीफबर्डस्चा. हे इटुकले पिटुकले हिरवे पक्षी छलावरणात (camouflaging) तरबेज आहेत. पानांत असताना पटकन ओळखू येत नाहीत. हे सुरेल शीळ घालत छान गातात. मग त्यांच्या आवाजाचा मागोवा घेत पानांमधली हालचाल टिपत नीट पाहिले तरच दिसतात. समोरच्या तारेवर वेडाराघू (Green Bee Eater)येऊन बसतो.हा पक्षी हवेतल्या हवेत मधमाश्या, चतुर असे कीटक पकडून पुन्हा पुन्हा त्याच जागेवर येऊन बसतो. हिरवा रंग,त्यावर तपकिरी छटा, डोळ्याबाजूचा काळापट्टा आणि त्याखालची काजळ रेखल्यासारखी दीप्त आकाशी रेघ ह्याला खूप शोभून दिसते. गरमीच्या मौसमात जवळपास सर्व झाडे फळांनी लगडलेली असतात. पेरू, चिकू, आंबे, काजू, कोकम, मोह, भोकरं, उंबर अशी अनेक फळांची रेलचेल पाहून पक्ष्यांचे अनेक थवे 'हे खाऊ की ते खाऊ' करत एका झाडावरून दुसऱ्या झाडावर मनसोक्त न्याहारी करत फिरताना पाहून मला खूप मजा वाटते.

आम्र ऋतूत सुरू झालेली एक शीळ अजूनही सरलेली नाही. कोकीळ कोकिळेसाठी गाणं गात असतो... कुहू? कुहू?... कुहू? कुहू? आणि मग मधूनच एक कर्कश्य आवाज कानांवर पडतो. त्यांच्या त्यांच्या पद्धतीने का होईना; पण कोकिळाबाईसुद्धा ह्या मधुर गाण्याला साद देत असतात.

उन्हाळा संपता संपता आणि पावसाळा सुरू होण्यापूर्वी इथे दोनतीन वादळं झाली. तशी ती इकडे नेहमीचीच. आमच्या घराच्या बाजूला माझं एक आवडतं फुलपाखराचं झाड (झुडुपवर्गीय झाड) आहे. त्याच्या जांभळ्या फुलांतला मध प्यायला त्यावर नेहमीच तऱ्हेतऱ्हेची रंगीबेरंगी फुलपाखरं (Common Mormon, Skipper, Tiger, Painted Lady, Monarch, छोटा चांदवा, अक्कडबाज, काळू, निळू, बिबळ्या,पानपंखी,इ.) आणि छोटे पक्षी (Purple Sunbirds, Purple Rumped Sunbirds, Yellow Eyed Babblers, इ.) येतात. ते पहायला आणि त्यांना कॅमेऱ्यात टिपायला मला खूप आवडतं.

महाराष्ट्राचं राज्यफुलपाखरू ब्ल्यू मॉरमॉन शेतभर हिंडतं; पण कुणास ठाऊक कुठे बसतं? अजूनतरी मला ह्याचा फोटो काढणं जमलेलं नाही. तर सांगायची गंमत



अशी की ह्या वादळांत फुलपाखराचं ते झाड पूर्णपणे आडवं झालं होतं; पण निसर्गाची किमया अशी की नंतरच्या दोनचार दिवसांत ते पुन्हा सरळ उभं राहिलं. त्यानंतरच्या 'निसर्ग' चक्रीवादळात जेव्हा हे झाड आडवं झालं तेव्हा ते पुन्हा उभं राहील अशी आम्हाला खात्रीच होती. पण आठवडा झाला तरी असं काही घडलं नाही.

त्यानंतर पुन्हा निसर्गाने आपली किमया वेगळ्याप्रकारे दाखविली. त्या झाडाच्या आडव्या झालेल्या सर्व फांद्यांवर उभे धुमारे फुटले आणि काही दिवसांतच ते झाड परत पहिल्यासारखे बहरलेले दिसायला लागले. आता त्याच्याकडे बघून कोणाला असं वाटणारही नाही की अजूनही ते मूळचे झाड खाली आडवे झालेले आहे.

उन्हाळ्यात ज्या ठिकाणी कडवे वाल लावले होते त्याठिकाणी काढणीच्यावेळी त्यातले थोडे वाल नेहमीप्रमाणे सांडले होते. पहिल्या पावसांतच त्यातून पुन्हा छोटी छोटी रोपे उगवून आली. ती काढून आम्ही त्या कोवळ्या वालांची भाजी करून खाल्ली. ही भाजी अतिशय पौष्टिक आणि चविष्ट असते.

कडक उन्हाळ्यामुळे पार सुकून गेलेलं चाफ्याचं नवीन रोप पावसाची सुरुवात झाल्याबरोब्बर तरारलं... अक्षरशः बहरून गेलं.

पावसाच्या आगमनाबरोबर आगमन झालं ते चातक पक्ष्याचं (Pied Cuckoo / Jacobin Cuckoo).

कोकिळ कुळातल्या ह्या पक्ष्याचं बाकी अंगं काळं

आणि हनुवटीपासून खालपर्यंतचा समोरचा भाग तसेच शेपटीच्या टोकाचा भाग पांढरा असतो. पावसाळा सुरू झाल्यापासून अजून एका मोठ्या पक्ष्याचं आगमन झालंय. हा पक्षी लांडोरीच्या मानाने किंचित छोटा असतो. हा आहे काळा अवाक (Black Ibis/Red Naped Ibis).

ह्याचं शरीर असतं निळसर झाक असलेलं मळकट काळ्यारंगाचं, खांद्यावर असतो एक मोठा पांढरा चट्टा, चोच असते लांब बाकदार, नारंगी डोळ्यांत असतात काळी बुब्बुळं आणि डोक्यावरचा भाग असतो लालेलाल. त्याच्या ह्याच रूपावरून संस्कृतमध्ये ह्याचं सार्थ नाव आहे 'रक्तशीर्ष'. हा पठ्ठ्या दुपारी घरासमोरच्या मोकळ्या जागेत खेकड्यांच्या बिळांत चोच घालून आत लपलेले छोटे बेडूक, खेकडे, जमिनीवरचे किडे, सरडे, गोगलगायी असे खाद्य खात असतो. सकाळी आणि संध्याकाळी साग किंवा नारळासारख्या उंच झाडांवर बसून हे 'कॅ?कॅ?कॅ?' असा कलकलाट करतात.

सूर्य मावळतीला येताच कोतवाल (Black Drongo) पक्षी सागांच्या टोकांवर बसलेले आढळतात. हे पक्षी गोंगाट्या व भांडखोर समजले जातात, पण आश्चर्य म्हणजे हे गरीब आणि लहान पक्ष्यांना कधीही त्रास देत नाहीत! उलट हे मोठ्या हिंस्त्रपक्ष्यांपासून उदा. कावळा, शिक्रा, ससाणा आणि गरुड ह्यांपासून इतर लहानग्या पक्ष्यांचं रक्षण करतात. म्हणूनच ह्यांना 'कोतवाल' हा किताब मिळाला असावा. ह्यांच्या दुभंगलेल्या शेपटीमुळे हे चटकन् ओळखू येतात. तसेच ह्यांच्या हवेतल्या करामतीही बघण्यासारख्या असतात.

अनेकदा पाऊस नसताना आम्ही गच्चीत आकाशातल्या रंगांची उधळण पहात चहाचा आस्वाद घेतो. तसा उन्हाळ्यात तर नेहमीच घ्यायचो.आकाशातील ह्या रंगछटा तरी किती म्हणाव्यात- लाल, नारंगी, गुलाबी, आकाशी, सोनेरी, पिवळ्या, जांभळ्या... जणू हे आकाश म्हणजे एक मोठ्ठा कॅनव्हास आहे आणि निसर्गदेवता नावाचा चित्रकार रोज त्यावर आपल्या नवनवीन कलाकृती साकारत आहे. ऋतुगणिक नाही... दिवसागणिक नाही तर अगदी क्षणाक्षणाला बदलत जाणाऱ्या मन मोहवणाऱ्या ह्या अगणित कलाकृती जशाच्या तशा टिपणं कधीकधी त्या कॅमेऱ्यालाही शक्य होत नाही. ह्यावेळी अनेक पक्ष्यांचे थवे आम्हाला आपापल्या घरट्यांकडे परतताना दिसतात. कधीतरी एखादा शिकारी पक्षी हवेत एकाच ठिकाणी स्थिरहोत (Hovering करत) आपल्या भक्ष्यावर झडप घालताना दिसतो. बगळ्यांच्या आकार बदलत उडत जाणाऱ्या माळा बघण्यात एक वेगळीच मजा असते.

कधी क्वचित एखादी क्रौंचाची (Cranesची) जोडी पश्चिमेकडून पूर्वेकडच्या डोंगर रांगांत उडत जाताना दिसते तर कधी करढोकांचे (Cormorantsचे) थवे. बाकी दिवसभर साळुंक्या, रानभाई, सातभाई, पिवळ्या डोळ्यांचा सातभाई (Yellow Eyed Babbler), साधा वटवट्या (Plain Prinia), राखी वटवट्या (Ashy Prinia), बुलबुल, टिटव्या, मैना, पोपट, पारवे, तांबट (Coppersmith Barbet), स्वर्गीयनर्तक, हळद्या, सुभग (Common Iora), हुदहुद (Common Hoopoe), खंड्या, शिंपी (Common Tailorbird), ससाणा (Indian Sparrow Hawk), शिक्रा इत्यादी असतातच.

बरं हे फक्त घराच्या आजुबाजूचं झालं बरं का! आमच्या शेताला लागूनच एक छोटा नाला आहे. तेथील पक्षी अजून वेगळे! घराच्या आसपास जसा व्हाईट थ्रोटेड किंगफिशरचा वावर असतो तसाच नाल्याकाठी कॉमन किंगफिशरचा. हा चिमुकला पक्षी मला खूप आवडतो. मी ह्याला प्रेमाने ड्वार्फी म्हणते. हा Dwarf Kingfisher नाही हे माहीत असूनही!... ह्याचं नाल्यावरून जाणाऱ्या इलेक्ट्रिक लाईनवर किंवा फांद्यांवर बसून पाण्यात सूर मारून मासे पकडणं, किंवा आपल्या जोडीदाराबरोबर नाल्याच्या ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत पाण्याच्या पृष्ठभागालगत उडण्याची शर्यत लावणं बघणं फारच मनोरंजक असतं. नाल्याकाठच्या झाडांमध्ये इतरही अनेक पक्ष्यांचं वास्तव्य आहे. धनेश (Grey Hornbill), निखार (Small Minivet), हळद्या (Black Hooded Oriole), खाटीक (Bay-Backed Shrike), पाणकावळा (Cormorants), पाणकोंबड्या (Water Hens), करकोचा (Stork), ढोकरी (Indian Pond Heron), नीळकंठ/नीलपंख (Indian Roller), तसेच महाराष्ट्राचा राज्यपक्षी म्हणजेच

हरियाल (Yellow Footed Green Pigeon) हासुद्धा इथे विसाव्याला येतो. हे सगळे आमच्या नाल्याकाठचे रहिवासी. नाल्यामध्ये आम्हाला अनेकदा कासवांचं आणि पाणसापांचं दर्शनही घडलंय.

शेतजमीन असल्याकारणाने इथे अनेक प्रकारचे कीटक, कोळी, पाली, सरडे आणि सापांचंही अस्तित्व आहे. जवळजवळ पाच महिन्यांहून अधिककाळच्या आमच्या इथल्या वास्तव्यात मला सातआठ सर्पांनी दर्शन दिलंय. शक्य तितक्या जवळ; पण सुरक्षित अंतरावरून मी त्यांना कॅमेऱ्यातही टिपलंय. जवळपास १४-१५ फूटलांब आणि मनगटाहून जाड असणारा बिनविषारी धामण आणि १ फूटलांब आणि बोटभर जाड असणारा जहाल विषारी 'गाठ्या' (स्थानिकनाव) ही सर्पसृष्टीची दोन विभिन्नरूपे!

पक्ष्यांचा किलबिलाट दिवसभर चालू असतो. सर्वसाधारणपणे पक्ष्यांचे आवाज ऐकून ते पक्षी घराजवळ आले आहेत की लांब आहेत ह्याचा अंदाज बांधता येतो आणि मग त्याप्रमाणे मी आणि आई कॅमेरा घेऊन बाहेर पडतो. असेच एकदा दुपारी निवांत बसलेलो असताना एक वेगळा आवाज कानांवर पडला- 'टर्रर्र् ?? टर्रर्रर्रर्र ???'. हळूच दरवाजा उघडून बाहेर पाहिले तर काय... २ गोडुलीगब्दुली बोचकी इथून तिथे पळापळ करत होती. हे होते तित्तर पक्षी (Francolin/Partridge). लालसर डोके, अंगावर तपकिरी रंगाच्या असंख्य छटा... त्यांतल्या एकाचे छाती आणि पोट नारंगी तर दुसऱ्याचे काळे-पांढरे चट्टेरी. इतके गोंडस आणि गुबगुबीत की मला तर पटकन् उचलून हातातच घ्यावेसे वाटले.

पण दरवेळी पक्षी आसपास असले तरी ते आवाज करतीलच असे नाही. आता हेच बघाना- असेच एका शांत दुपारी मी आणि आई फेरफटका मारायला म्हणून कॅमेरा घेऊन घराबाहेर पडत होतो. दरवाजा उघडताना थोडा आवाज झाला आणि अचानक समोरच्या गुलाबांतून कितीतरी पक्षी प्रचंड किलबिलाट करत भुर्रकन् उडून बाजूच्या झाडांमध्ये शिरले. त्यांत होते- भारद्वाज, खंड्या, कोतवाल, सातभाई, साळुंक्या, बुलबुल, कावळे आणि पोपट. एव्हढे सगळे पक्षी एकाच ठिकाणी जमले होते आणि आम्हाला त्यांची जराशीही चाहूल लागू न देण्याइतपत शांत होते... जणु काही त्यांची गुप्त बैठकच चालू होती.

नंतरच्या दोनतीन दिवसांत असं लक्षात आलं की घरासमोरच्या करंजाच्या झाडात एक घुबड (Barn Owl)वास्तव्याला आलं होतं आणि हे सर्व पक्षी त्याच्या मागे लागून त्याला हुसकावून लावत होते. आठवडाभर हे असंच सुरू राहिलं. शेवटी ते घुबड निघून गेलं. तेव्हा वाटलं, 'ह्या घुबडाला कसे हुसकावून लावता येईल बरे?' ह्याचीच ती मसलत चालली असावी कदाचित.

अजून काही गंमतीशीर प्रकार म्हणजे एकदा एक बेडूक बघितला जो आमची चाहूल लागताच एकदम टम्म फुगला (हा असतो Balloon Frog). दुसरं म्हणजे मी एकदा गच्चीत उभी होते आणि अचानक एक खंड्या भरवेगात उडत अगदी जवळ माझ्या तोंडासमोरच आला. मीही भांबावले आणि तोही. मग हवेतच स्वत:ला सावरून तो त्याचा मार्ग बदलून दुसरीकडे तसाच भरवेगात उडून गेला.

पावसाळा सुरू झाल्यापासून निसर्ग हिरवा शालू पांघरल्यागत दिसतोय. रात्रीच्या अंधारात अजूनही काही काजवे आम्हाला सोबत करतात. पावसाच्या सुरुवातीला तर असंख्य असे हे 'दिवे' आजुबाजूच्या झाडांवर झगमगताना दिसायचे. खिडकीवरच काय... आमच्या घरातही शिरायचे. मनप्रसन्न करून जायचे.

उन्हाळ्याने रखरखीत झालेले साग आता गच्च पानांनी भरून हिरवेगार झालेत. कालांतराने त्यांना फुले-फळे आली आहेत. इतर झाडांप्रमाणेच, ह्या सागांवरसुद्धा आपल्या खारूताईंची मस्तीचालू असतेच. कधीकधी तर आमच्या जाळीच्या दरवाज्यावरसुद्धा खेळत असतात.

आजुबाजूच्या शेतांमध्ये दूरवर नुसती भातशेती पसरलेली दिसते. वाऱ्याच्या अगदी मंद झुळकेवरसुद्धा अलगदपणे डोलणारं हे पीक डोळ्यांना खूप सुखावतं. हळुहळू त्यांमध्ये पिवळसर लोंब्याही दिसायला लागल्या आहेत. काळेमिरीचे नवीन तुरे (घड) दिसायला लागले आहेत. दालचिनीला गुलाबीसर अशी नवी पालवी फुटलेली आहे. अजूनही काही झाडांवर कैऱ्या येत आहेत.

मग आजी त्यांचं लोणचं करते. पावसाळ्याआधी

भोकर, चिकू, पेरू, आंबा, काजू, कोकम यांची रेलचेल असायची. आता भेंडी, शिराळी, श्रावण-काकडी, लालभोपळा, कारली अशा भाज्यांची रेलचेल आहे. नवीन लावलेली अबोली, ग्लॅडियोला, आणि झेंडूसुद्धा आता मोठी होऊन फुलांनी बहरली आहेत.

ह्यावेळी आम्ही पहिल्यांदाच नाचणीची लागवड केली आहे. गावात नाचणीला नागली म्हणतात. भातलावणी लोकांना माहीत असते पण ह्या नागलीची लागवड तितकीशी प्रसिद्ध नाही. पूर्वी ह्या भागात फक्त नागलीचीच लागवड व्हायची. पण त्यावेळी गरीबांचे अन्न म्हणून हिणवल्या जाणाऱ्या नागलीला चांगला बाजारभाव मिळत नसे. त्यामुळे हळुहळू इथल्या शेतकऱ्यानी नागली लावणं थांबविलं. आता गेली काही दशकं इथे नाचणीऐवजी फक्त भाताचं पीक घेतलं जातं. म्हणूनच की काय जेव्हा आम्ही नागली लावायला घेतली तेव्हा आजुबाजूच्या शेतांतले शेतकरी कौतुकाने येऊन बघून गेले. आता 'Super Foods' मध्ये समावेश झाल्यापासून नागलीला पुन्हा सुगीचे दिवस आले आहेत. असो, तर सर्वांत आधी शेण, माती व पालापाचोळा यांचे थर लावून वरचा थर जाळला जातो. मग त्यावर नाचणीची पेरणी (Sowing) होते. मग ज्या जागेवर नाचणीची लागवड करायची असते त्याजागी होते बेणणी (Weeding). गंमत म्हणून मीही थोडी बेणणी केली. दुसऱ्या दिवशी मात्र पाय आणि कंबर पार कामातून गेली. कुंडीतली बेणणी आणि शेतातली बेणणी ह्यांत किती मोठा फरक असतो ते तेव्हा कळले.

नाचणीच्या हिरव्यागार रोपांची सशक्त वाढ झाल्यावर ती काढून त्यांना बेणणी केलेल्या जागेत नुसतं टाकायचं असतं. नाचणीची रोपं भाताच्या रोपांपेक्षा दणकट आणि जाड असल्याने त्यांना सहजासहजी जमिनीत खोचता येत नाही म्हणजेच त्यांची 'लावणी' करता येत नाही. ही रोपं नुसतीच ओळीने टाकली जातात... गालिचासारखी जमिनीवर आडवी पसरविली जातात. मग त्यांच्या नैसर्गिक प्रेरणेने ती हळुहळू मुळं जमिनीत रोवून स्वबळावर उठून उभी राहतात. हीसुद्धा निसर्गाचीच ताकद!

कणखर डोंगरांतूनही आपल्याला निसर्गाची ताकद जाणवते. समोरच ह्या कणखरतेचं प्रतीक असलेला सह्याद्री पसरलाय. पावसाने स्वच्छ धुवून निघालेला त्याचा काळापाषाण आणि त्यावरची हिरवी गार झाडं बघताक्षणी अंगात उत्साह संचारतो. भीमाशंकर, गोरखगड आणि सिद्धगड हे सह्याद्रीचे काही कडे आमच्या अगदी समोरच उभे आहेत. अनेकदा त्यांवर ढग उतरलेले दिसतात. (कधीकधी आमच्या शेतातही ढग उतरतात!). ऋतुगणिक बदलणारी त्या सह्याद्रीची अनेकानेक रूपे आम्ही आत्तापर्यंत पाहिली आहेत. सध्या त्यांवर अनेक छोटे-मोठे धबधबे सुरू झाले आहेत.

तर असे हे इकडचे निसर्गसौंदर्य आम्ही गेले ५-६ महिने याचि देही याचि डोळा अनुभवतोय. क्षणाक्षणाला बदलत जाणारी निसर्गाचीही असंख्य रूपे प्रत्येक वेळेस काहीतरी नवीन दाखवून अथवा शिकवून जातात. अजूनही नवनवीन पक्षी, प्राणी व कीटक- त्यांतील अनेक छलावरणात तरबेज!- दिसत राहतात.

ह्या लेखात मी त्या सगळ्यांची वर्णनंच काय पण नावेही लिहिलेली नाहीत. निसर्गाची विविधता अचंबित करणारी आणि स्फूर्ती देणारी आहे. तर जाता जाता समोरच्या सह्यकड्याला पाहून मला स्फुरलेली ही एक छोटीशी कविता-

तो काळा-कभिन्न कडा
ठाकुनी पुढे जो उभा राहतो
कणखर पाषाणी अंग जयाचे
गर्जिता सकळ मराठा जागतो
मुखीज्वालेच्या जन्म घेऊनी
अजुनी गरम रक्तात उसळतो
कडेकपार जयाचे सुंदर
हिमालयापरि भव्य भासतो
दऱ्या-खोऱ्यातून वाहता वारे
अखंड असा हा नाद गुंजतो
'मावळप्रांतीचा कर्ता-करविता
जो भूमीस ह्या पावन करतो
जो सांभाळी मुलूख आमुचा
तो सह्याद्री नाव राखितो'

*

**पर्यटनविशेष लेख**

# गारगोटी मिनरल म्युझियम

**✶ दीपक माधव धैर्यवान ✶**

प्रवासाच्या निमित्ताने आपण विविध ठिकाणांना भेटी देत असतो. अशी वेगवेगळी ठिकाणे पहात असताना अचानक किंवा काही योगायोगाने तेथून जवळपास असणाऱ्या काही वेगळ्या ठिकाणांची माहिती मिळते व आपण त्याही ठिकाणांना भेटी देऊन काही नवीन माहिती मिळवून आपल्या सहलीचा आनंद अधिक वृद्धिंगत करत असतो. कधीतरी आपल्या मित्रपरिवारात व आप्त्स्वकीयातही सहज गप्पागोष्टी करीत असताना आपल्याला मिळालेल्या अशा वेगळ्या ठिकाणांची नोंद आपल्या मनाच्या कोपऱ्यात किंवा माझ्या सवयीप्रमाणे आपल्या नोंदवहीत करून ठेवीत असतो.

सांगायचा मुद्दा असा की आम्हालाही अशाच एका जगावेगळ्या व नितांतसुंदर ठिकाणाला भेट देण्याचा योग आला व त्या विलक्षण अनुभवाने धन्य झालो.

आम्ही सख्खी व चुलत भावंडं म्हणजे आमचे आजोबा श्री. रामराव गणपतराव धैर्यवान ह्यांची नातवंडे.आमचा बहीण-भावंडांचा 'धम्माल मंडळी' असा एक व्हॉटस् अॅपवर ग्रुप बसवलाय. अर्थात हा ग्रुप तयार करण्याचे संपूर्ण श्रेय सौ. निरुपा अरविंद व्यवहारकर (म्हणजेच निरुपा केशव धैर्यवान) ह्या आमच्या बहिणीचे आहे हे मी आवर्जून नमूद करतो. आम्ही आमच्या ग्रुपद्वारे वर्षातून किमान दोनतरी सहली आयोजित करतो. शिवाय इतरही प्रसंगी एकमेकांना भेटत राहून संपर्कात राहण्याचा प्रयत्न करतो.

साधारण दोन वर्षापूर्वी आम्ही आमची हिवाळी सहल मुंबई नासिक मार्गावरील इगतपुरी येथील ड्यूड्रोप रिसोर्ट (DEW DROP RESORT) येथे घेऊन गेलो होतो. शिवाजी पार्क येथील श्री.पराडकर ह्यांच्या 'चैतन्य ट्रॅव्हल्स' ह्यांची बस आम्ही आमच्या सहलीसाठी आयोजित करतो. ड्यू ड्रॉप रिसॉर्ट हे अतिशय सुंदर आहे. राहण्याची व जेवणाची उत्तम सोय केली जाते. रिसोर्टमध्ये सर्व सोई म्हणजे पोहोण्याचा तलाव, विविध खेळ उपलब्ध आहेतच. आवर्जून भेट द्यावी असे हे रिसॉर्ट आहे हे निर्विवाद. आम्ही ह्या रिसॉर्टचा ताबा शनिवारी सकाळी घेतल्याने दुसऱ्या दिवशी म्हणजे रविवारी दुपारी बारा वाजेपर्यंत हे रिसॉर्ट सोडणे आम्हाला क्रमप्राप्त होते. आता प्रश्न असा पडला की इतक्या लवकर मुंबईला परत जावून सहलीची मजा काय?कारण मुंबई इगतपुरी हे अंतर साधारण १२५ किलोमीटर असल्याने मुंबईला परत जावयाला साधारण अडीच ते तीन तास लागले असते. नेमक्या त्याच कारणाने आम्ही दुपारच्या जेवणानंतर गप्पा गोष्टी करीत असताना मला अचानकपणे एका जगावेगळ्या संग्रहालयाची आठवण झाली. झाले होते असे की आमचे एक स्नेही लेफ्टनंट कर्नल प्रभाकर सामंत व सौ. अर्चना सामंत ह्यांची व आमची मैत्री फार जुनी.आमचे एकमेकांकडे नेहमीच जाणे येणे असते. असेच एकदा त्यांच्या अंधेरी येथील निवासस्थानी गेलो असता माझे लक्ष एका बोनसाईसारख्या छोट्या झाडाकडे गेले. विशेष म्हणजे त्या झाडाला पाने, फुले, फळ नव्हती; तर छोटे छोटे सुंदर रंगीबिरंगी मण्यासारखे दिसणारे गारगोटे होते. गारगोटीचे इतके सुंदर झाड? मग सामंत साहेबांनी ह्या गारगोटी म्युझियमबद्दल इथ्थंभूत व छान माहिती दिली. घरी आल्यानंतर मी हे सर्व माझ्या डायरीमध्ये लिहून ठेवले. त्यांनीच सांगितले होते की हे संग्रहालय नाशिक-सिन्नर



मार्गावर मालेगाव येथे आहे. ड्यू ड्रॉपची ह्या गप्पागोष्टीवेळी मला अचानक आठवण झाली. मी ताबडतोब सामंतसाहेबाना फोन करून खातरजमा केली. त्याचवेळी आमची वहिनी वंदना चित्रसेन धैर्यवान हिने सांगितले की, तिने हे संग्रहालय पाहिले असल्याने तिला कसे जायचे हे ठाऊक आहे. मग काय; दुसऱ्या दिवशी ह्या संग्रहालयाला भेट देण्याचे ठरविले. हे म्युझियम मालेगाव येथे महाराष्ट्र औद्योगिक वसाहतीत आहे. संग्रहालय पाहण्याकरिता प्रत्येकी रुपये १०० तिकीट आहे. तेथील एका मार्गदर्शकाने आम्हाला एकत्रित होण्याचे आवाहन केले व आम्ही तसे करताच ते मला म्हणाले, ''आपण सर्व खाजगी बसने आला आहात. मग बसचा चालक असेलच ना? मग त्यानाही बोलवून घ्या. त्यांना हे संग्रहालय खूपच आवडेल आणि त्यांचे वेगळे तिकीट काढण्याची आवश्यकता नाही.'' माणुसकीचा असाही वेगळा अनुभव.

संग्रहालयात प्रवेश करताक्षणीच भव्य दालनात मध्यभागी असलेला भारतमातेचा फायबरमधील सुंदर पुतळा आपले लक्ष वेधून घेतो .आमच्या मार्गदर्शकाने एकेक दालन दाखवण्यास सुरुवात केली. हे गारगोटी मिनरल म्युझियम हे जगातील एकमेव असे म्युझियम आहे. असेच दुसरे म्युझियम दिल्ली येथे आहे व ही दोन्ही म्युझियम्स एकाच व्यक्तीची आहेत, त्यांचे नाव श्री. कृष्णचंद्र पांडे असे आहे. हे वैमानिक अभियांत्रिकी पदवीधर असून ते १९७८ ते १९९३ पर्यंत भारतीय नौदलात एक कर्तबगार अधिकारी म्हणून कार्यरत होते. ते स्वत: सांगतात त्याप्रमाणे त्यांच्या व्यवसायाचा आणि ह्या गारगोटी खनिजांच्या छंदाशी एकमेकाशी सुतराम संबंध नाही; परंतु हेही कबूल करतात की त्यांच्या नौदलातील सेवेचा ह्या जगावेगळ्या छंद जोपासण्यास सिंहाचा वाटा आहे. कारण ह्या सेवेद्वारे त्यांना जगातील अनेक देशांना भेट देण्याचा योग आला व प्रत्येक ठिकाणी भेट देत असता त्यांनी ही अमूल्य खनिजे, गारगोटी व अनेक मूल्यवान रत्नांचा अभ्यास करून त्यांचा संग्रह करीत राहण्याचे त्यांना सहज शक्य झाले. हा छंद त्यांना जडला कसा असे विचारले असता त्यांनी सांगतले, ''मी १६ वर्षाचा असताना मला एकदा एक दगड घरात असलेला सापडला. तो दगड हातात घेतला असता त्यांना एका वेगळ्याच अध्यात्मिक भावनेची अनुभूती झाली.'' त्याच्या अस्तित्वाने ते भारावून गेले व त्या क्षणापासून ह्या छंदाने पूर्णपणे झपाटले.

एकाच व्यक्तीने जमा केलेल्या ह्या असंख्य गारगोटी व विविध खनिजे त्याच्या मूळ स्वरुपात पाहाताना आपण दिग्मूढ होऊन जातो. काही कोटीच्या घरात असलेला हा संग्रह आता काही अब्जांच्या वर पोहोचला आहे. ह्यावरून त्याच्या भव्यतेची कल्पना येते. ते नम्रपणे कबूल करतात की हा संपूर्ण खजिना केवळ त्यांच्या मालकीचा असून त्यावर कोणत्याही सरकारी किंवा पुरातत्व विभागाचा कोणताही अधिकार व अंकुश नाही. उलट श्री. कृष्णचंद्र पांडे प्रतिवर्षी सरकारला ३० लाख रुपये कर भरतात! हे संग्रहालय सर्वांनी प्रत्यक्ष पाहाण्यासारखे आहे. त्यातील काही गारगोटी, खनिजे व रत्ने ह्यांचे यथोचित वर्णन करणे केवळ अशक्य!! उदाहरणादाखल एकच सांगतो की, संग्रहालयात असलेल्या श्री. गणेशमूर्तीपैकी एक मूर्ती एका अखंड क्वार्टझमधून कोरून बनवलेली आहे. तिचे वजन ७१ किलो आहे. तसेच अखंड क्वार्टझमधून कोरलेल्या गौतमबुद्धाच्या मूर्तीचे वजन ६५ किलो आहे. हिरे, माणके, गारगोटीचे इतके नितांतसुंदर नमुने आपली मती गुंग करतात. विविध खनिजांचे तर इतके प्रकार आहेत की त्यांचे वर्णन करावयाचे म्हटल्यास एक स्वतंत्र लेखच लिहावा लागेल. उदाहरणार्थ क्वार्टझ

जो सिलीकॉन व ऑक्सिजनचे संयुग आहे. सल्फर, डायमंड (कार्बन), ग्राफाईट, क्यालसाईट (चुनखडी), मेसोलाईट, नेट्रोलाईट, अबब खनिजांचे किती प्रकार. आपण तर कधीही न ऐकलेली नावे. संग्रहालयात हे सगळे प्रकार पाहायला मिळतात. संग्रहालयाची मांडणी तर इतकी राजेशाही आणि सुबक आहे की ती पाहताना मन प्रसन्न होते. श्री. कृष्णचंद्र पांडे सांगतात त्याप्रमाणे हा झीओलाईटचा संपूर्ण जगातील एकमेव संग्रह आहे. झीओलाईटचे शास्त्रीय पृथकरण करणे ह्या लेखात तरी अप्रस्तुत वाटते. म्हणूनच मी ही खनिजे, गारगोटी व विविध रत्नांचा एक आगळा वेगळा व एकमेवाद्वितीय कसा आहे त्याचे वर्णन केले आहे.

चांद्रयान मोहिमेंतर्गत प्राप्त झालेल्या चंद्रावरील अवशेषापैकी एक छोटासा अंश श्री. पांडे ह्यांनी ह्या संग्रहालयात जतन करून ठेवलेला आपणास पाहायला मिळतो. माझ्याप्रमाणे आपणासही असा प्रश्न पडला असेल की सगळी झीओलाईटस कशी निर्माण झाली असतील. श्री. कृष्णचंद्र पांडे ह्यांच्या म्हणण्यानुसार ही सर्व खनिजे ६० ते ६५ लाख वर्षापासून होत असलेल्या ज्वालामुखीच्या उद्रेकातून नैसर्गिकपणे निर्माण झालेली आहेत. झीओलाईट हा शब्द ग्रीक भाषेतून आलेला आहे. त्याचा ग्रीक भाषेतील अर्थ 'उकळते पाणी' असा आहे. ज्वालामुखीच्या उद्रेकापासून जेव्हा त्याची निर्मिती होते तेव्हा ती मोठमोठ्या बुडबुडे सदृष्य खडकांच्या स्वरूपात असतात. ह्या खडकांमध्ये निसर्गातच बराचसा पाण्याचा अंश बंदिस्त स्वरूपात असतो. त्यातच काही काळाने गारगोटी तयार होतात. कालांतराने जेव्हा हे दगड फुटतात किंवा अतिकुशल कारागिरांकडून व्यवस्थित फोडले जातात तेव्हा त्यात असलेल्या ह्या विविधरंगी गारगोटी उपलब्ध होतात. श्री. पांडेसाहेब हे आवर्जून नमूद करतात की, हे बहुतेक ज्वालामुखी आपल्या महाराष्ट्रातील दख्खनच्या पठारावरील आहेत. ह्या व्यतिरिक्त देश विदेशातून जमा केलेली गारगोटी व खनिजेदेखील प्रक्रिया करून ह्या संग्रहालयात ठेवलेली आहेत. श्री. पांडेसाहेबांनी स्थापन केलेल्या 'सुपर्ब मिनरल्स प्रायवेट लिमिटेड' हा त्यांच्या कंपनीचा अद्यावत कारखाना आहे. त्यावर प्रक्रिया केलेल्या गारगोटी संपूर्ण




जगात निर्यात केल्या जातात. आधी लिहिल्याप्रमाणे हा त्यांचा व्यवसाय आता काही अब्जांच्या घरात पोहोचला आहे. ह्यावरूनच त्यांच्या अतिभव्यतेची कल्पना आपण करू शकतो.

तेव्हा मंडळी 'गारगोटी मिनरल म्युझियम' ह्या माझ्या लेखाने आपली उत्सुकता जागवली गेली असेल. ह्या गारगोटी म्युझियमचे वर्णन मी माझ्या मर्यादेनुसार करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु प्रामाणिकपणे सांगतो की हे वर्णन वाचून जगातील एकमेवाद्वितीय संग्रहालयाची आपल्याला केवळ पुसटशी कल्पना येऊ शकेल. आपण मात्र ह्या संग्रहालयाला प्रत्यक्ष भेट देऊन त्यात अत्यंत देखण्या स्वरुपात व कलात्मकरीत्या प्रदर्शित केलेला हा विविधरंगी गारगोटी, खनिजे व रत्ने ह्यांचा हा खजिना प्रत्यक्ष पाहून एका विलक्षण अनुभूतीचा प्रत्यय घ्यावा व आपल्या मनात कायम स्वरुपात संस्मरणीय करावा असे मनोमनी वाटते .

*

लेख

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# When my palette knife could bloom flowers off the Canvas

⁎ Mrs. Aditi Aniket Talpade ⁎

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

My tryst with this beautiful and satisfying art goes back to last year when I was preparing myself to enter the new innings of my life. People say that turning 40 is like restarting your life in a new light. So here I was promising myself all things 'firsts', as I turned 40. Learning new things in my field and starting a new venture, was one of the things on the not so long list of mine.

One day as I was surfing through social media sites, I came across this beautiful art which was surfing up and was yet to be tapped in India. This Art Form is called Russian Sculpture Painting.






This is a new painting technique that combines sculpture as well as painting. I was thrilled to know that with materials like wood, canvas and possibly all surfaces could act as my canvas. Decorative Plaster scooped artistically and lifted with palette knives, to make motifs, most commonly floral motifs, into thin petals and laid on the canvas to form voluminous flowers. These 3D flowers bring the much needed dimensions and life like appearance to your piece of art. The tinted plaster being sturdy can withstand all the exterior weather conditions. Learning to wield a palette knife smoothly on the colored plaster to create a beautifully shaped painting is the crux of this art form. I was totally smitten by its beauty and decided to learn it in a rare hands-on workshop. And indeed it

was an enriching experience for me. But the Art Director in me couldn't just sleep over it. For days I thought of using this art form into something interesting as well as useful. My 40th was nearby and instantly I thought of grabbing this opportunity to give birth to my venture called AdiTatva (Adi-first ever, Tatva- essence of the matter). With the help of this decorative plaster, palette knives, practice and god gifted creative skills, i started creating souvenirs to gift my near and dear ones as token of appreciation. It was an instant hit amongst my friends, who were in total awe of this art form. This gave my venture a Nitro-Boost. I started creating more of such souvenirs, personalized Name plates, House number plates, fridge




magnets, magnetic Memo Pads for the ones who appreciated Art and valued handmade stuff. When Covid 2020 lockdown was declared, it opened my avenues of online platform where I could exhibit and sell them. In all, I can sum up this experience by two quotes which every artist and art lover will relate to- "Every Artist dips his brush in his soul, and paints his own nature into his pictures." - Henry Ward Beecher. "Art washes away from the soul, the dust of everyday life". - Pablo Picasso.

*

## अभिनंदन

### संजीव धुरंधर यांना जागतिक पातळीवर ॲवॉर्ड



अमेरिकन फिजिकल सोसायटीने (APS) प्राध्यापक संजीव धुरंधर यांना त्यांच्या फिजिक्समधील अतुलनीय योगदानाबद्दल फेलो म्हणून सन्मानित केले आहे. APS कौन्सिलने त्यांच्या GRAVITATIONAL PHYSICS DIVISION (DGRAV)च्या शिफारसींवरून सप्टेंबर २०२०च्या मीटिंगमध्ये ही घोषणा केली.

त्यांच्या science मधील आणि विशेषत: भौतिक शास्त्रामधील सर्वोत्तम कामगिरीबद्दलची ही मान्यता अतिशय प्रतिष्ठेची समजली जाते. हा एक दुर्मिळ आंतरराष्ट्रीय सन्मान असून विशेषत: भारतात राहून कार्यरत असणाऱ्या शास्त्रज्ञांसाठी अतिशय मानाचा आहे. त्यांच्या 'गुरुत्वीय लहरींच्या शोधाच्या भक्कम, सैद्धांतिक पायाभरणीसाठीच्या, विशेषत: डेटा विश्लेषणाच्या तंत्रज्ञानासाठीच्या, तसेच भारतात गुरुत्वीय लहरींसाठी community विकसित करण्याच्या मुलभूत योगदानाबद्दल' हा मान त्यांना प्रदान करण्यात येत आहे.

भारतामध्ये संजीव धुरंधर यांनी तीन दशकांपूर्वी गुरुत्वीय लहरींच्या शोधक्षेत्रातील कामाचे बीज रोवले. या कामासाठी त्यांना मेघनाद सहा सुवर्णपदक (वैयक्तिक), फिरोदिया विज्ञान भूषण (वैयक्तिक), Milner's Special Breakthrough पुरस्कार (सांघिक) यासारख्या विविध राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

ते सध्या गुरुत्वाकर्षणीय लहरींच्या डेटा विश्लेषण तंत्रज्ञानाच्या सुधारित प्रक्रियांवर काम करत आहेत.

त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन.

लेख

# Lockdown

**✶ Sweeny Navalkar ✶**

I am Sweeny Navalkar, daughter-in-law of Rohini and Ajit Navalkar. I have been living in Paris, France for around 6 years now, with my husband, Mihir and twin children, Samar and Alayna. I have a small business here making customized cakes and cookies for birthdays, anniversaries, and other special occasions. You can find a few of my creations on https://www.facebook.com/fhb.fr




Covid-19 hit France quite hard in March, April, and May this year. Many deaths occurred and the country was forced into lockdown. The initial days of the lockdown were very trying; people started hoarding items, it was difficult to find staple items like bread, rice, flour in the supermarkets. It was scary to go out; every day, we were learning something new about the virus. Face masks were initially unavailable as the pharmacies were only limiting their sale to medical professionals. Businesses, large and small, were hard hit; as was mine. Staying alone at home all day and night for so many days was mentally taxing as well.




Schools were closed and classes were being held over video calls. The children adjusted well under the circumstances, despite getting restless since they couldn’t meet their friends, or go to their favorite playgrounds. They were very happy that both parents were with them all day. Board games came out of the cupboard; we bonded better as a family

than ever before.

This pandemic served as a boon in disguise in other ways; our interactions with our extended family and our friends in India and around the world became more frequent. Every week we used to prepare a quiz game for playing with the others; it was mentally very simulating and took the edge off staying locked up at home all day. We looked forward to these weekly interactions.

Since we could not meet our friends in Paris, we made a pact with each other. Every Friday, all of us would cook the same food. So, it was pau bhaji one Friday, Asian food the next Friday and so on. It was a nice concept which gave us a feeling of virtually sitting together eating the same food, despite the reality of being stuck at home. One Friday, the theme was "any item made from Rawa". I made "Suralichi Wadi" and "Laadi Pao" out of Rawa; both dishes turned out quite nice. On another Friday, it was a Pasta theme. My husband, an authentic fish-loving P.Prabhu, decided to make some crab meat pasta which was quite tasty as well.

Starting June, as the number of new infections began to reduce, the French government lifted the lockdown in stages. And we got back to our routine busy lives, albeit with an abundance of precautions. I do hope that there is no second wave, that we overcome the pandemic and there are no further lockdowns. But, I reminiscence the family bonding, the quizzes, the experiments with different cuisines etc. that became an integral part of this lockdown. It taught me the importance of slowing down and enjoying life one day at a time.

I have attached some photos of some of my cakes. It would be great if you can publish some of them.




बालविभाग

लेख

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# Lockdown - I Hate You

**✶ Miss.Radhika Suresh Agaskar ✶**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀







It is very boring to be stuck at home during the summer holidays. Almost every summer holidays, we have gone out of town. And when we don't go anywhere, I play fantasy football, cricket, dabba-ais-pais, lock and key, kabaddi and hide and seek with my gang of building friends and my cousin sister.

But because of this rotten lockdown, I am stuck in the house, since the middle of March. At the most, I can go to the terrace to play with my friend and kittens. I keep on asking my parents and Aaji to play with me but no one has time-they are all busy! Since the rains have started, we cannot go up to the terrace anymore! The kittens come down to play with me-they love chasing feathers so I tied a feather to the end of my skipping rope and dangled it in front of them-they go crazy, trying to get it and even climb up the door grill to get it!

At least, now, my school has started-online! We meet every-day on Google Classroom. Some of my friends keep their videos on and then get a scolding from the teacher. But, I always keep both my audio and video off! My teachers show us nice videos and we also have quizzes.

My Baba plays Cluedo and UNO with me. But I defeat him almost every time! And Aie draws pictures, which I then colour. I have learnt how to shade properly and can even paint using poster colours.

I want this lockdown to get over fast so that I can play with my friends and go to school and celebrate my 10th birthday.